# कॉक्सिटच्या विद्यार्थ्यांना मिळाले ' गरूडपंख '

लातूर- संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयातील (कॉक्सिट) तीन विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीतून ट्रीनिटी केटीपी या सॉफ्टवेअर कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणुन निवड झाली आहे. विशेष म्हणजे ही कंपनी कॉक्सिटच्याच माजी विद्यार्थी खुंदमिर करपुडे व तेजस चव्हाण या विद्यार्थ्यांनी स्थापन केली आहे. यामुळे कॅम्पस मुलाखतीतून एम.एस्सी.सी.एस.(द्वितीय वर्ष) मध्ये शिकत असणा-या आरती रेवाडकर, रूमा मनियार, अनिल गिरी या विद्यार्थ्यांची कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणुन निवड झाली आहे.

कॉक्सिटचे प्राचार्य डॉ.एम.आर. पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच कंपनीच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ट्रीनिटी केटीपी कंपनीचे संचालक खुंदमिर करपुडे व तेजस चव्हाण यांनी कॉलेजमधून मिळालेल्या ज्ञान व प्रोत्साहनाच्या साह्यानेच यशस्वी वाटचाल झाल्याचे सांगून सर्व शिक्षकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा.कैलाश जाधव यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. बी.एल.गायकवाड, उपप्राचार्य एन.एस.झुल्पे, टीपीओ प्रा.किशोर जेवे उपस्थित होते. कॉक्सिटच्याच विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर कंपनी चालू करणे आणि विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड होणे, हे ट्रेनिंग प्लेसमेंट सेलचे मोठे यश मानले जात आहे. शिक्षण चालू असतानाच विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली आहे. यामुळे त्यांना आयुष्यात यशाची भरारी घेण्यासाठी ' गरूडपंख ' मिळाले आहेत.